महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125
epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ८२ किंमत : ५ रु. | पाने ४

## दिन विशेष...

१७९३ : रमाबाई पेशवे यांचे निधन.
१८९६ : ज्ञानपीठ पुरस्कार विजेते सुप्रसिध्द कन्नड कवी दत्तात्रय रामचंद्र बेंद्रे यांचा जन्म झाला.
१९२० : डॉ.आंबेडकरांनी मूकनायक या पाक्षिकाची सुरुवात केली.
१९९२ : ६५ वे साहित्य संमेलन कोल्हापूर येथे झाले.

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८२,२६९.७८ −२९६.५९ (०.३६%) |
| डॉलर | ₹ ९१.९५ |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | १८ |
| दिल्ली | १९ | ०९ |
| मुंबई | ३२ | २२ |
| नागपूर | २९ | १६ |
| पुणे | ३१ | १३ |

### सुविचार

ज्ञान हे केवळ शिक्षणातून मिळतं, त्यासाठी शाळेची गरज आहे.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०५ संध्या-६:१७

### सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६८,१९५/- ३,९५,०००/-

### केळी भाव

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# सुनेत्रा पवारांची आज उपमुख्यमंत्रीपदी निवड, लगेचच शपथविधी!

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर झाली होती राजकारणात एंट्री



**वृत्तसंस्था । मुंबई**

अजित पवार यांच्या अकाली निधनाने रिक्त झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी सुनेत्रा पवार यांची शनिवारी निवड केली जाणार आहे. त्यानंतर लगेचच त्यांचा शपथविधी पार पडेल, असे समजते. राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदाची निवड करण्यासाठी शनिवारी आमदारांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली जाईल. त्यानंतर पवार यांचा शपथविधी पार पडण्याची शक्यता आहे.

सुनेत्रा पवार यांचा राज्य मंत्रिमंडळात लगेचच समावेश करण्यात येणार आहे. हा शपथविधीचा समारंभ अत्यंत साधेपणाने पार पाडला जाईल. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. तेव्हा पक्षाच्या वतीने सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांना देण्यात आली. शनिवारी दुपारी विधिमंडळ पक्षाची बैठक पार पडेल. त्यात सूनेत्रा पवार यांची एकमताने निवड केली जाईल. राष्ट्रवादीच्या वतीने लगेचच मुख्यमंत्र्यांकडे निवडीचे पत्र दिले जाणार आहे. सुनेत्रा पवार यांचा शपथविधी लगेचच पार पडेल, असे समजते. अर्थात, राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या नियोजित कार्यक्रमावर ते अवलंबून असेल. अजित पवारांकडील वित्त व नियोजन, उत्पादन शुल्क ही खाती पक्षाकडेच कायम राहावी, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांकडे व्यक्त करण्यात आल्याचे समजते.

### ➢ कोण आहेत सुनेत्रा पवार?

**सुनेत्रा पवार यांचा जन्म (१८ ऑक्टोबर १९६३) धाराशिव जिल्ह्यातला. धाराशिवचे नेते आणि शरद पवारांचे जुने स्नेही पद्मसिंह पाटील यांच्या त्या भगिनी आहेत. सुनेत्रा पवार यांना लहानपणापासूनच राजकारण आणि समाजकारणाचा वारसा मिळाला होता. १९८० मध्ये त्यांचे अजित पवार यांच्याशी लग्न झाले. अजित पवार राजकारणात सक्रिय झाल्यानंतरही सुनेत्रा पवार राजकारणापासून दूर होत्या. बारामतीमध्ये शेती आणि समाजकारणात त्यांचा सहभाग मात्र होता. पर्यावरण आणि स्वच्छतेची आवड असणाऱ्या सुनेत्रा पवारांनी बारामतीमध्ये एन्व्हायर्नमेंटल फोरम ऑफ इंडिया ही सामाजिक संस्था स्थापन केली होती. या संस्थेच्या माध्यमातून त्या पर्यावरणाशी निगडित काम करत आल्या आहेत.तसेच बारामतीमधील महिलांना रोजगार मिळावा यासाठी त्यांनी टेक्सटाईल पार्कची सुरुवात केली. याज या पार्कमध्ये हजारो महिला काम करत आहेत. २००६ पासून टेक्सटाईल पार्कचे अध्यक्षपद सुनेत्रा पवार यांच्याकडे आहे. तसेच त्या विद्या प्रतिष्ठान या संस्थेवरही विश्वस्त म्हणून काम करत आहेत.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी सकाळी विमान अपघातात निधन झाले. पवार कुटुंबासह संबंध महाराष्ट्रासाठी हा मोठा धक्का होता. बारामती आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासाठी ही मोठी हानी असल्याचे मानले जाते. पक्ष आणि पवार कुटुंबात आलेल्या रितेपणातून वाट काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी सुनेत्रा पवार यांची निवड होणार असून उपमुख्यमंत्रीपदी त्यांचा शपथविधी होणार असल्याची चर्चा आहे.अजित पवार यांचे महायुती सरकारमधील स्थान, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्व आणि एकूणच पक्षाच्या हितासाठी त्यांचा उत्तराधिकारी लवकर नेमणे गरजेचे झाले आहे. त्यामुळेच निधनानंतर अवघ्या दोन दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेस आणि पवार कुटुंबाला यातून मार्ग काढणे (पान २ वर)

### ➢ राज्यसभेच्या खासदार

**लोकसभेत पराभव झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांची वर्णी राज्यसभेवर लावण्यात आली. प्रफुल्ल पटेल यांच्या रिक्त झालेल्या जागेसाठी राज्यसभेची निवडणूक झाली. या जागेवर १३ जून २०२४ रोजी सुनेत्रा पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यानंतर त्या राज्यसभेच्या सदस्य झाल्या.**

## थोडक्यात

### ‘देवखेळ’ वेबसीरीज वादाच्या भोवऱ्यात!

**रत्नागिरी ।** जिल्ह्यातील कोकणातील लोककथा आणि शिमगा (होळी) उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ‘देवखेळ’ आधारित असून, स्थानिक श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यातील संघर्ष दाखवते. मात्र, गुहागर परिसरातील नागरिक आणि भाविकांनी वेबसीरीजच्या टीझर आणि ट्रेलरमध्ये शंकासुर देव यांच्या चित्रणाबाबत गंभीर आक्षेप घेतला आहे. त्यामुळे सोशल मीडियावरून टीझर आणि ट्रेलर काढून टाकण्याची मागणी जोर धरू लागली आहे.शंकासुर देव हे गुहागर आणि परिसरातील प्राचीन आणि श्रद्धास्थान मानले जाते. शिमगोत्सव काळात हजारो भाविक येथे श्रद्धेने दर्शन घेतात आणि उपासना करतात. मात्र, ‘देवखेळ’च्या टीझर आणि ट्रेलरमध्ये शंकासुर देवाला क्रूर, अमानवी आणि अंधश्रद्धेशी जोडलेला देव म्हणून दाखवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे.



### मराठवाड्यात स्ट्रॉबेरी लागवड यशस्वी

**नांदेड ।** सातारा जिल्ह्यातील थंड हवामान असलेल्या महाबळेश्वर येथे पारंपरिकरित्या स्ट्रॉबेरीचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. मात्र आता स्ट्रॉबेरीची शेती महाबळेश्वर पुरती मर्यादित न राहता मराठवाड्यात देखील विस्तारू लागली आहे. नांदेड जिल्ह्यात स्ट्रॉबेरी लागवडीचा यशस्वी प्रयोग होत आहे. जिल्ह्यात एका तरुण शेतकऱ्याने अवघ्या दहा गुंठ्यात स्ट्रॉबेरीची बाग फुलवली असून त्यातून त्याला लाखो रुपयाचं उत्पन्न देखील मिळत आहे.

# किमान वेतन ठरविले तर रोजगार घटेल

## घरगुती कामगार प्रकरणात सरन्यायाधीशांचे थेट विधान

**वृत्तसंस्था । नागपूर**

**घरगुती कामगारांना किमान वेतनाचा मूलभूत अधिकार मिळावा यासाठी देशभरातील दहा कामगार संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली.सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर या याचिकांवर सुनावणी झाली.**




याचिकेनुसार, अनेक राज्यांमध्ये घरगुती कामगारांना किमान वेतन कायदा, १९४८ तसेच वेतन संहिता, २०१९ यांच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना किमान वेतनाची हमी तसेच सामाजिक सुरक्षा लाभ मिळत नाहीत, जे संविधानातील कलम २१ आणि २३ चे उल्लंघन ठरते.पुरेशा कायदेशीर संरक्षणाअभावी घरगुती कामगारांची स्थिती ‘जबरदस्तीची मजुरी’ किंवा ‘बेगार’ या स्वरूपाची होत आहे. घरगुती कामात किमान किंवा योग्य वेतन न देणे हे सक्तीच्या मजुरीचे स्वरूप घेत आहे. घरगुती कामाला अद्यापही अकुशल काम म्हणून कमी लेखले जाते. घरकाम हे गृहिणींचे कर्तव्य आहे, या रूढ कल्पनांमुळे घरगुती कामगारांच्या श्रमांना योग्य मोबदला दिला जात नाही, असा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

प्रकरण हाती घेताच सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी याचिका ऐकून घेण्याबाबत अनिच्छा व्यक्त करत, ‘प्रत्येक घरगुती कुटुंब न्यायालयीन वादात ओढले जाईल’, अशी टिप्पणी केली.याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ अधिवक्ता राजू रामचंद्रन यांनी युक्तिवाद करत सांगितले की, सिंगापूरसारख्या देशांमध्ये घरगुती कामगारांना नोंदणीशिवाय नोकरी देता येत नाही. तसेच, आठवड्याची सुट्टी, किमान वेतन आदी अटी बंधनकारक आहेत. त्यावर सरन्यायाधीशांनी निरीक्षण नोंदवले की, कल्याणकारी सुधारणा करताना अनेकदा अनपेक्षित परिणाम होतात आणि त्यामुळे शोषणाचे नवे प्रकार उद्भवू शकतात. ‘आपण किमान वेतन ठरवले, तर देशातील रोजगाराच्या गरजेचा विचार करावा लागतो. मागणी–पुरवठ्याचा प्रश्न आहे. किमान वेतन निश्चित केल्यास अनेकजण घरगुती कामगार ठेवणेच टाळतील आणि त्यामुळे अधिक अडचणी निर्माण होतील’, (पान २ वर)

# ठाकरे बंधूंबाबत आक्षेपार्ह पोस्ट; धिंड काढत मनसैनिकांनी दिला चोप

**वृत्तसंस्था । वसई:**

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विरोधात एका तरुणाने अपशब्द उच्चार करीत समाजमाध्यमावर टीका केली आहे. या टिकेनंतर मनसे कार्यकर्त्यांनी या तरुणाला शोधून काढत चांगलाच चोप देत धिंड काढली. त्याचा व्हिडीओ ही मोठ्या प्रमाणात समाज माध्यमावर व्हायरल होत आहे.**



समाज माध्यमावर प्रसिद्धी मिळविण्यासाठी आता कोणत्याही थराला जाऊन एखाद्यावर टीका करणे, याशिवाय त्याचा व्हिडीओ तयार करून समाज माध्यमावर टाकणे असे प्रकार वाढीस लागत आहेत. नुकताच नालासोपारा येथील एका तरुणाने मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे आणि शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याबद्दल अर्वाच्च भाषेत वक्तव्य करून त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर टाकला होता. ही आक्षेपार्ह पोस्ट टाकणे या तरुणाच्या चांगलेच अंगलट आले आहे.

ही आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित झाल्यानंतर मनसेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. त्यांनी या तरुणाचा शोध घेत थेट राहत्या घरातून बाहेर काढून चांगलाच चोप देत त्यांची धिंड ही काढली आहे. याचा व्हिडीओ ही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. तरुणाच्या या आक्षेपार्ह पोस्टमुळे विविध स्तरातून त्याच्या कृतीबद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# दहावी–बारावी परीक्षेत गैरप्रकार आढळल्यास केंद्राची मान्यता रद्द; बोर्डाचा इशारा

**वृत्तसंस्था । नाशिक**

**फेब्रुवारी–मार्चमध्ये होणाऱ्या इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षांवेळी ज्या केंद्रांवर गैरप्रकार आढळतील, त्यांची मान्यता रद्द करण्याचा इशारा विभागीय शिक्षण मंडळाने दिला आहे.**



राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षा अवघ्या काही दिवसांवर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नाशिक विभागीय मंडळ आणि जिल्हा मुख्याध्यापक संघ यांची संयुक्त बैठक झाली. मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुभाष बोरसे, सचिव मोहन देसले यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. परीक्षेतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सर्व केंद्रांवरील खोल्यांमध्ये आत आणि बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. २०२५ च्या परीक्षेत ज्या केंद्रांवर गैरप्रकार आढळले होते, त्यांची मान्यता रद्द करण्याबाबत कठोर भूमिका मांडण्यात आली. राज्यातील अतिवृष्टी व आपत्तीमुळे बाधित झालेल्या (पान २ वर)

# गोवा एक्स्प्रेसला आता बऱ्हाणपूर स्थानकावर थांबा

**प्रतिनिधी । जळगाव**

**गोव्यातील वास्को द गामा आणि नवी दिल्लीतील हजरत निजामुद्दीन रेल्वे स्थानकांदरम्यान दररोज धावणाऱ्या लोकप्रिय आणि वेगवान गोवा एक्स्प्रेसला जळगाव, भुसावळनंतर आता आणखी बऱ्हाणपूर स्थानकावर थांबा मिळाला आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सोयीसाठी हा थांबा प्रायोगिक तत्त्वावर मंजूर केला असून, त्याची अंमलबजावणी ३० जानेवारीपासून सुरू देखील झाली आहे.**




रेल्वेच्या या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या सीमेलगत वसलेल्या बऱ्हाणपूर व परिसरातील हजारो रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. खंडव्याचे खासदार ज्ञानेश्वर पाटील यांनी बऱ्हाणपूरला गोवा एक्स्प्रेसचा थांबा मिळावा, यासाठी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. प्रवाशांची वाढती संख्या, बऱ्हाणपूरचे व्यापारी व शैक्षणिक महत्त्व तसेच मध्य प्रदेश, महाराष्ट्र सीमावर्ती भागातील दळणवळणाची गरज लक्षात घेऊन त्यांनी हा मुद्दा वेळोवेळी रेल्वे मंत्रालयाकडे (पान २ वर)

बऱ्हाणपूरसह आसपासच्या भागातील प्रवाशांना गोवा एक्स्प्रेसचा थेट लाभ इतकी वर्षे मिळत नव्हता. आता बऱ्हाणपूरला थांबा मिळाल्याने प्रवाशांचा वेळ, खर्च आणि गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. दरम्यान, हा थांबा प्रायोगिक स्वरूपाचा असल्याने प्रवाशांचा प्रतिसाद, प्रवासी नियमित संख्या आणि तांत्रिक बाबींचा आढावा घेतल्यानंतर तो कायमस्वरूपी करण्याबाबत निर्णय रेल्वे मंत्रालयाकडून घेतला जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, गोवा एक्स्प्रेसचे बऱ्हाणपूर शहरात शुक्रवारी मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी खासदार ज्ञानेश्वर पाटील यांच्या प्रयत्नांचेही कौतुक झाले.

# पुणे, सातारानंतर आता नाशिकही होणार ‘कॅन्सरमुक्त’

## नाशिक जिल्ह्याचा ‘सर्व्हिकल कॅन्सर फ्री मिशन’मध्ये समावेश

**वृत्तसंस्था । नाशिक**

**द महिला आणि किशोरवयीन मुलींसाठी प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेच्या दिशेने राज्य शासनाने सुरू केलेल्या ‘गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगमुक्त महाराष्ट्र’ या महत्त्वाकांक्षी अभियानाचा विस्तार करण्यात येत आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्यानंतर आता नाशिक जिल्ह्याचाही या अभियानात अधिकृत समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यात लवकरच या अभियानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होणार आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविली जाणार आहे. देशात गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. दर आठ मिनिटांनी एका महिलेला या आजारामुळे जीव गमवावा लागत आहे. दररोज सुमारे २०० महिलांचा मृत्यू होत आहे. हा कर्करोग देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक आढळणारा कर्करोग आहे. मात्र, वेळेवर तपासणी, योग्य उपचार आणि एचपीव्ही लसीकरणाच्या माध्यमातून हा कर्करोग पूर्णपणे टाळता येऊ शकतो.

या अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे लवकर जागरूकता, वेळेवर प्रतिबंध आणि नऊ ते १४ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींसाठी एचपीव्ही लसीकरण करून गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचा समूळ नायनाट करणे, हा आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील लाखो मुलींच्या आरोग्याचे आणि भविष्यातील सुरक्षिततेचे संरक्षण करण्यासाठी एक व्यापक प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेचे प्रारूप उभे राहत आहे. याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगमुक्त महाराष्ट्र अभियानाच्या माध्यमातून (पान २ वर)

शासनाबरोबर समन्वय साधून जनजागृती, प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि समुदाय पातळीवर विश्वास निर्माण करण्यासाठी जीविका फाउंडेशन कार्यरत आहे. फाऊंडेशनचे संचालक जिग्नेश पटेल यांनी, राज्य शासनासोबत या अत्यंत महत्त्वाच्या सार्वजनिक आरोग्य अभियानाचा भाग होण्याचा आम्हाला अभिमान असल्याचे म्हटले आहे. नाशिक जिल्ह्याच्या समावेशामुळे १० प्राधान्य जिल्ह्यांमध्ये टप्प्या- टप्प्याने राबविण्यात येणाऱ्या या राज्यव्यापी अभियानाला अधिक गती मिळणार आहे.

# नाशिक जिल्हा परिषदेला अखेर जाग; ‘त्या’ शिक्षकांना कार्यमुक्त करण्याचे आदेश

**वृत्तसंस्था । मालेगाव**

**ऑनलाइन पद्धतीने नियमानुसार तालुक्याबाहेर बदल्या झालेल्या मालेगाव तालुक्यातील २७ प्राथमिक शिक्षकांना कार्यमुक्त न करण्याचा तुघलकी निर्णय नाशिक जिल्हा परिषदेने घेतला होता. त्या विरोधात शिक्षक संघटनांनी आवाज उठवल्यानंतरही त्याकडे कानाडोळा करण्याचे धोरण जिल्हा परिषद प्रशासनाने अवलंबले होते. अखेर चार महिन्यांनी आता प्रशासनाला जाग आली आहे. ३१ जानेवारीला या शिक्षकांना कार्यमुक्त करण्याचे आदेश काढण्यात आला आहे.**

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत बदलीसाठी शासन निर्णयानुसार गेल्या ऑगस्ट महिन्यात ऑनलाइन प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानुसार नाशिक जिल्ह्यातील ३८३८ शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या. मात्र ही प्रक्रिया पार पडल्यावर पावणे दोन महिने उलटल्यानंतरही संबंधित शिक्षकांना (पान २ वर)

## संपादकीय

### ध्रुवीकरणाचा सोस

समाज आधुनिक झाला आहे असे आपण म्हणतो. डिजिटल साक्षर झाला आहे असेही मानतो. हे मानताना जातीच्या आधारावर भेदभाव करण्याचा आजार आजही कायम आहे याकडे दुर्लक्ष करतो. पूर्वीइतके त्याचे प्रमाण जास्त नसेल किंवा आपल्याला तो दिसत नसेल म्हणून हा भेदभाव संपला असल्याचे मानायचे कारण नाही. जातींमुळे पोळल्या जाणाऱ्या आणि जातींमुळेच पोळणाऱ्या या दोन्ही वर्गातील एका गटांत जात जिवंत ठेवण्याची धारणा आजही कायम आहे, हे वास्तव आहे. शिक्षण संस्थांमध्येही जातींचा भेद पाळला जातो. त्याची अनेक उदाहरणे आहेत. काही ठिकाणी आत्महत्यांच्या घटना घडल्या आहेत. त्या रोखण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग म्हणजे यूजीसीने नवे नियम केले आहेत. दुर्दैवाची बाब अशी की हेच नव्या संघर्षाचे कारण ठरू पाहत आहे. या नियमांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात १२ याचिका दाखल झाल्या आहेत. तूर्त न्यायालयाने नियमांना स्थगिती दिली आहे. आता मार्चमध्ये पुढील सुनावणी होणार आहे. हा खरेतर कुलींग पीरिएड समजायला हवा. या काळात शांत आणि समंजसपणे विचार व्हावा. तथापि, तसे होण्याची चिन्हे नाहीत. किंबहुना प्रकरण अधिकच पेटवले जात आहे. उत्तर भारतात त्याची धग अधिक आहे. विद्यार्थ्यांच्या संघटनाच नाही तर वकिलांच्या संघटनाही नियमांच्या विरोधात आक्रमक झाल्या आहेत. काही सरकारी अधिकाऱ्यांनी नोकऱ्यांचा राजीनामा दिला आहे. विषय किती गांभीर्याने घेतला गेला आहे याची ही झलक आहे तसेच भविष्यात हा विषय किती तापणार आहे त्याचा इशारा आहे. शिक्षण संस्थांमधून नकारात्मक विचारांची शिदोरी घेऊन बाहेर पडणारे उद्याचे भारतीय नागरिक समाजात एकत्रितपणे आणि सलोख्याने राहतील का हा प्रश्न कोणालाच पडत नाही हे विशेष. त्यांच्या डोक्यात जर आताच भेदभाव संपवण्याच्या नावाने भेदभावाचेच विष पेरले गेले तर आपण समानतेच्या कितीही चांगल्या गोष्टी मांडल्या तरी नकारात्मकतेने भरलेल्या मनांमध्ये त्याला स्थान मिळण्याची शक्यता राहणार नाही. मुळात विद्यापीठांत तसेच महाविद्यालयांतील भेदभावाविरोधात मार्गदर्शक सूचना अगोदरच अस्तित्वात होत्या. सूचना होत्या, मात्र त्या पाळण्याचे कायदेशीर बंधन नव्हते. ते आता घातले गेले आहे. त्यासाठी एक नियमावली तयार केली गेली आहे. सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे आणि जात, वर्ग अथवा सामाजिक पार्श्वभूमीच्या अनुशंगाने होणारा कोणताही भेदभाव रोखणे हा यामागचा उद्देश आहे असे म्हटले जाते. या उद्देशाबद्दलच सामान्य किंवा ज्याला सवर्ण म्हटले जाते त्या वर्गात संशयाचे वातावरण आहे. समाजमाध्यमे आणि अनेक संघटनांचे नेते आणि सल्लागार यांनी या विषयावर प्रखर भूमिका मांडली आहे. काही प्रख्यात कवी मंडळी आणि कलाकारही परस्परांच्या विरोधात सोशल रोष व्यक्त करत आहेत. त्यांच्या मनात अनेक किंतू या नव्या नियमांविषयी आहेत. त्याचा आधार घेत विखारातून अधिक विखारीपणाकडे घेऊन जाणारा प्रचार केला जातो आहे. नव्या नियमांना आक्षेप घेणाऱ्यांचा प्रमुख मुद्दा असा आहे की संस्थांमध्ये या नियमांचा उपयोग सामान्य वर्गाच्या विरोधात केला जाऊ शकतो.

# महापौर, उपमहापौर पदासाठी शेवटच्या दिवशी घेतले १६ अर्ज

## भाजपने १२ तर शिवसेनेने घेतले ४ अर्ज; २ रोजी होणार चित्र स्पष्ट

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिका निवडणुकीनंतर आता महापौर आणि उपमहापौर निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले असून राजकीय पक्षांकडून हालचालींना वेग आला आहे. महापौर आणि उपमहापौर पदासाठी अर्ज घेण्याचा शुक्रवारी (दि.३०) शेवटचा दिवस होता. या शेवटच्या दिवशी भाजपा आणि शिवसेनेकडून १६ अर्ज घेण्यात आले. यात भाजपने १२ तर शिवसेनेने ४ अर्ज घेतले. दरम्यान, २ फेब्रुवारी रोजी अर्ज दाखल करण्यात येणार असून त्यानंतरच कोण होणार महापौर? आणि कोण होणार उपमहापौर? याचे चित्र स्पष्ट होणार आहे.**





जळगाव महानगरपालिका निवडणुकीत यंदा भाजपने ४६ तर शिवसेना (शिंदेगट) ने २२ जागांवर बाजी मारली आहे. त्यांना राष्ट्रवादी (अजित पवार गट) व अपक्ष असे मिळून आता महायुतीचे ७० संख्याबळ झाले आहे. त्यामुळे महापौर हा भाजपचा व उपमहापौर हे शिवसेनेचा होणार हे सूत्र निश्चित झाले आहे. गेल्या दोन दिवसांपासून महापौर व उपमहापौरसाठी एकही अर्ज घेण्यात आला नव्हता. मात्र अंतिम दिवशी म्हणजेच शुक्रवारी (दि.३०) भाजपचे शहर सरचिटणीस विशाल त्रिपाठी, गटनेते प्रकाश बालाणी, उपगटनेते नितीन बरडे आणि प्रतोद डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी दुपारी १२.१५ वाजेच्या सुमारास मनपात दाखल होत नगरसचिव सतिश शुक्ला यांच्याकडून महापौर आणि उपमहापौर दोन्ही पदासाठी अर्ज घेतले. भाजपाकडून प्रकाश बालाणी यांनी महापौर पदासाठी ४ फॉर्म, नितीन बरडे यांनी उपमहापौर पदासाठी ४ तर प्रतोद डॉ.चंद्रशेखर पाटील यांनी २ फॉर्म घेतले. महायुती म्हणून आम्ही १२ अर्ज घेतल्याची माहिती यावेळी गटनेते, उपगटनेत्यांकडून देण्यात आली. शिवसेना (शिंदेगट) कडून चौथ्यांदा निवडून आलेले नगरसेवक मनोज सुरेश चौधरी यांनी देखील महापौर आणि उपमहापौर पदासाठी प्रत्येकी २ असे ४ अर्ज घेतले आहेत. दोन्ही पक्षांकडून महापौर आणि उपमहापौरपदासाठी अर्ज घेण्यात आले असले तरी २ फेब्रुवारी रोजी कोण अर्ज भरणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.



## जळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी

प्रतिनिधी । जळगाव

पाऊस आणि गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतांची शिवसेना (ठाकरे) गटाचे उपजिल्हाप्रमुख प्रा.भाऊसाहेब सोनवणे व दीपाली सोनवणे यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या वादळी पावसामुळे मका, गहू, हरभरा, ज्वारी तसेच केळी या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. जळगाव तालुक्यातील कानळदा, भोकर परिसरातील शेतकरी हवालदिल झालेला असून शासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

## दुचाकी चोरट्यास अटक

प्रतिनिधी । जळगाव

**रामानंदनगर पोलिसांकडून एका दुचाकी चोरट्याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून एक चोरीची मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.**

अमीन शाह जहुर शाह (रा. न्यू दूध फेडरेशन, पिंप्राळा हुडको) असे ताब्यात घेण्यात आलेल्या संशयिताचे नाव असून त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. त्याच्या ताब्यातून चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

# संत गजानन महाराज मंदिरात भागवत कथा सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**येथील मोहाडी रोडवरील जीवनमोती सहकारी गृहनिर्माण सोसायटीतील श्री संत गजानन महाराज मंदिराच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त श्रीमद भागवत कथा सप्ताहासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

शनिवार, दि.३१ रोजी सकाळी ७ वाजता ज्येष्ठ संचालक ॲड.बाबासाहेब दप्तरी व बाळासाहेब वडनेरे यांच्याहस्ते सपत्नीक अभिषेक व आरती करण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी ४ ते ७ या वेळेत दीपा तापडिया व त्यांच्या सहकाऱ्यांचा सुंदरकांड कार्यक्रम व त्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता मंदिराचे अध्यक्ष अरुण सोनवणे व जीवनमोती सोसायटीचे अध्यक्ष मधुकर पाटील यांच्याहस्ते सपत्नीक आरती करण्यात येणार आहे.



दि.१ ते ७ फेब्रुवारीदरम्यान चिमुकले राम मंदिराचे ह.भ.प. दादामहाराज जोशी यांचा श्रीमद भागवत कथा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. कथेची वेळ दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत असल्याचे आयोजकांनी कळविले आहे.

शनिवार, ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे तर रविवार, दि.८ रोजी सकाळी ५.३० ते ७ वाजेदरम्यान, गजानन महाराज यांच्या प्रकटदिनानिमित्त अकरा पुरोहितांद्वारे अभिषेक, आरती करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता भागवत कथा सप्ताहनिमित्त काल्याचे किर्तन होणार आहे.

दुपारी १२.३० वाजता आरती व महाप्रसाद आणि सायंकाळी ५ ते ७ वाजेदरम्यान स्वरांजली ग्रुपतर्फे भक्ती गीत व भावगीतांचा कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. सायंकाळी ७.३० वाजता आरती व रात्री ८ ते १० या वेळेत महाप्रसादाचे वितरण होणार आहे. सर्व कार्यक्रम व भागवत कथा सप्ताहास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी, असे आवाहन श्री संत श्रेष्ठ गजानन महाराज बहुउद्देशीय ट्रस्टच्यावतीने करण्यात आले आहे.

## पान १ वरुन

**सूनेत्रा पवारांची आज......**

क्रमप्राप्त ठरत आहे. अजित पवारांच्या उत्तराधिकारी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवारच असाव्यात असा एक मतप्रवाह राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये आहे. माजी विधानसभा उपाध्यक्ष, आमदार नरहरी झिरवळ यांनी तशी इच्छाही बोलून दाखवली आहे. दरम्यान मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना प्रफुल्ल पटेल म्हणाले की, अजित पवार यांच्याकडे जी जबाबदारी होती, त्या जबाबदारीबाबत आम्हाला निर्णय करावा लागणार आहे. त्यामुळे आम्ही सर्वांनी मुख्यमंत्र्यांना एवढंच सांगितलं की येत्या काही दिवसांत लवकरात लवकर आम्हाला त्याबाबतचा निर्णय घ्यायचा आहे. त्यासाठी आमच्या पक्षाच्या सर्व आमदारांनाही बोलून, त्यांच्याशी चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा लागणार आहे. २०२४ ची लोकसभा आणि कौटुंबिक वाद – २०२३ साली अजित पवार यांनी वेगळा निर्णय घेत महायुती सरकारला पाठिंबा दिला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या मंत्रिमंडळात ते उपमुख्यमंत्री झाले. या निर्णयामुळे राष्ट्रवादीत दोन गट पडले आणि अजित पवारांचा गट अधिकृत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचा निर्णय केंद्रीय निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांनी दिला. २०२४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांनी सुनेत्रा पवार यांना सुप्रिया सुळेंच्या विरोधात उमेदवारी दिली. पवार कुटुंबासाठी हा मोठा कसोटीचा काळ होता. या निवडणुकीत पवार कुटुंब सरळ सरळ दोन गटात विभागलेले दिसले. अजित पवारांचे सख्खे बंधू आणि त्यांच्या अडचणीच्या काळात नेहमी साथ देणारे श्रीनिवास पवारही शरद पवार यांच्या बाजूने होते. मात्र सुनेत्रा पवार यांनी अजित पवारांना खंबीर साथ देत नेटाने लोकसभेचा प्रचार केला. मात्र त्यांचा विजय होऊ शकला नाही. सुप्रिया सुळे यांना ७.३२ लाख मते मिळाली होती. तर सुनेत्रा पवार यांना ५.७३ हजार मते मिळाली होती. सुप्रिया सुळे यांनी १.५९ लाख मतांनी विजय मिळवला होता.

**किमान वेतन ठरविले......**

असे सरन्यायाधीश म्हणाले. सरन्यायाधीशांनी ट्रेड युनियनमुळेच देशाची औद्योगिक प्रगती खुंटली असल्याची टिप्पणी केली. या संदर्भात त्यांनी उदाहरण देताना सांगितले की, सर्वोच्च न्यायालयानेही एका एजन्सीकडून प्रत्येकी ४० हजार रुपये दराने कामगार सेवा घेतली होती, मात्र प्रत्यक्ष कामगाराला केवळ १९ हजार रुपयेच मिळत होते. किमान वेतन लागू केले, तर या युनियनमुळे प्रत्येक घर न्यायालयात खेचले जाईल', असेही त्यांनी नमूद केले. राज्य शासनाकडे बोट – याचिकाकर्त्यांनी घरगुती मदतनीसांची दयनीय स्थिती सातत्याने अधोरेखित करावी आणि संबंधित घटकांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी दबाव आणावा, एवढेच आम्ही नमूद करतो. घरगुती मदतनीसांच्या कल्याणासाठी आणि त्यांचे शोषण रोखण्यासाठी प्रत्येक राज्यातील सक्षम प्राधिकरण योग्य यंत्रणा विकसित करेल, अशी आम्हाला आशा व विश्वास आहे. याचिकाकर्त्यांच्या निवेदनांमधील तक्रारींकडे सर्व राज्य सरकारांनी गांभीर्याने लक्ष द्यावे, असे सांगत ही याचिका निकाली काढण्यात येत आहे.

**गोवा एक्स्प्रेसला जळगाव......**

मांडला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आल्याने गोवा एक्स्प्रेसला बऱ्हाणपूर येथे थांबा मंजूर झाला आहे. नवीन वेळापत्रकानुसार १२७७९ वास्को द गामाहजरत निजामुद्दीन ही गाडी दररोज दुपारी ०१.२९ वाजता बऱ्हाणपूर रेल्वे स्थानकावर दाखल होऊन पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होईल. तर १२७८० हजरत निजामुद्दीन वास्को द गामा ही गाडी दररोज सकाळी ०७.४९ वाजता बऱ्हाणपूर येथे थांबेल. या दोन्ही गाड्यांच्या थांब्यामुळे दिल्ली, गोवा तसेच उत्तर आणि दक्षिण भारताकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी बऱ्हाणपूर एक महत्त्वाचे स्थानक ठरणार आहे. यापूर्वी वास्को द गामा येथून सुटल्यानंतर हजरत निजामुद्दीनकडे जाणाऱ्या गोवा एक्स्प्रेसला जळगाव–भुसावळनंतर थेट खंडवा येथेच थांबा होता. मध्ये कुठेच न थांबणारी ही गाडी आता बऱ्हाणपूरला प्रवाशांची चढ–उतर करेल.

**पुणे, सातारानंतर आता......**

किशोरवयीन मुलींच्या आरोग्याला प्राधान्य देण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचेल याची खात्रीही त्यांनी दिली आहे. मुलींचे संरक्षण करणे हे आपले नैतिक आणि सामाजिक दायीत्व आहे. कॉर्पोरेट घटकांनी सीएसआरच्या माध्यमातून या अभियानात सहभागी व्हावे आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाविरुद्धच्या आपल्या सामूहिक लढ्याला बळ द्यावे, असे आवाहन केले आहे.

**नाशिक जिल्हा परिषदेला......**

कार्यमुक्त करून बदली झालेल्या ठिकाणी हजर करून घेतले गेले नव्हते. जिल्हा परिषदेकडून होणाऱ्या या कालापव्ययामुळे शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाला. त्या विरोधात आंदोलनाचे हत्यार उपसण्याचा इशारा दिल्यावर अखेर गेल्या १५ ऑक्टोबर रोजी नाशिक जिल्हा परिषदेने बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करण्याचे आदेश काढले होते.

**दहावी–बारावी परीक्षेत......**

१० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याच्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली. तसेच परीक्षक आणि नियामकांची संख्या वाढवून कामाचा ताण कमी करण्यासाठी, एका परीक्षकास जास्तीत जास्त २०० तर नियामकास १००० उत्तरपत्रिका तपासणीसाठी देण्याबाबत चर्चा झाली. सातत्याने परीक्षक म्हणून काम करणाऱ्या शिक्षकांऐवजी आतापर्यंत हे काम न केलेल्या नवीन शिक्षकांना संधी देण्याबाबत विचार विनिमय झाला. केंद्र संचालक, कर्मचारी आणि पर्यवेक्षक यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला. ५३ वर्षांवरील शिक्षकांना तसेच मुख्याध्यापकांना परीक्षक आणि नियामक कामातून सवलत देण्याबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत मुख्याध्यापक संघाचे एस. बी. देशमुख यांनी, परीक्षा निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी मुख्याध्यापक आणि मंडळ यांच्यात समन्वय असणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले.

# केसीई सोसायटीच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये रंगणार नवरंग सुरांचा नजराणा

प्रतिनिधी । जळगाव

**केसीई सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त 'नवरंग' या सांगीतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यात हिंदी चित्रपट सृष्टीतील अजरामर संगीतकारांच्या सुमधुर गीतांचा नजराणा सादर केला जाणार आहे. या कार्यक्रमाची निर्मिती केसीई सोसायटीच्या कान्ह ललित कला केंद्रातर्फे करण्यात आली आहे.**



शनिवार, दि.३१ रोजी सायंकाळी ६ वाजता महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात गायक मंगेश वाघ, समीक्षा माकोडे, अक्षय गजभिये, मयुरी हरिमकर, तन्वी वडोदकर, शुभांगी बडगुजर, सुभाष तळेले, वादक देवेंद्र गुरव (ढोलक आणि कोंगो), राहुल कासार (तबला), गौरव काळंगे (कीबोर्ड), प्रसाद कासार (बासरी), राजेश्वरी रत्नपारखी (बासरी) आणि कैलास निकम (ऑक्टोपॅड) हे कलाकार आपली कला सादर करणार आहेत. केसीई सोसायटीचे सांस्कृतिक समन्वयक शशिकांत वडोदकर यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम आयोजित केला आहे. निवेदन कान्ह ललित कला केंद्राचे समन्वयक प्रसाद देसाई करणार आहेत. रसिक, प्रेक्षकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य संजय सुगंधी यांनी केले आहे.

## मू. जे. विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट

प्रतिनिधी । जळगाव

येथील मू. जे. महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स विभागातील विद्यार्थ्यांनी औद्योगिक भेट अंतर्गत नुकतीच शिरसोली रोडवरील जैन हिल्स अँड फूड प्लांटला भेट दिली.

यात डॉ.प्रतिभा निकम, सोनाली शर्मा, भावना मानेकर या शिक्षकांसह २५ विद्यार्थ्यांचा समावेश होता. भेटीदरम्यान डॉ.शरद दुगर, श्री. राणे, बी. एस. पाटील यांनी कंपनीतील विविध उत्पादनांची माहिती व डेमॉन्स्ट्रेशन दिले. विद्यार्थ्यांनी सोलर प्लांट व्यतिरिक्त केळी टिशु कल्चर, सर्व प्रकारची पिके आणि फळे आधुनिक तंत्रज्ञानाने उगविण्याची पद्धती समजून घेतली.

## जिल्हाधिकारी कार्यालयात २ रोजी लोकशाही दिन

प्रतिनिधी । जळगाव

जिल्हास्तरीय लोकशाही दिनचे आयोजन सोमवार, दि.२ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अल्पबचत सभागृहात करण्यात आले आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांनी दिली आहे.

ज्या नागरिकांनी यापूर्वी तालुका लोकशाही दिनात अर्ज केलेला असेल आणि त्या अर्जासंबंधी एका महिन्याच्या आत तालुकास्तरावरुन कोणतेही उत्तर मिळालेले नसेल, अशा वैयक्तिक हितसंबधाबाबतच्या तक्रारी घेऊन या लोकशाही दिनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विद्यापीठात विद्यार्थ्यांना कौशल्य विकासावर मार्गदर्शन

## पीएम–उषा योजनेंतर्गत व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेतर्फे करण्यात आले होते आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व पीएम–उषा योजनेंतर्गत व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेत बुधवार, दि.२८ रोजी विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आंतरवैयक्तिक कौशल्य, नातेसंबंध कौशल्ये व नेतृत्व विकास यासह विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.**




कार्यक्रमाचे उद्घाटन पीएम–उषा प्रकल्प प्रमुख प्रा.आशुतोष पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या प्रा.पवित्रा पाटील, व्यवस्थापन प्रशाळेच्या संचालिका प्रा.मधुलिका सोनवणे आदी उपस्थित होते. उद्घाटन सत्रात प्रा.आशुतोष पाटील यांनी पीएम–उषा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी कौशल्य विकासावर मार्गदर्शन केले. पहिल्या सत्रात उद्योजक विश्वनाथ कल्याण यांनी आंतरवैयक्तिक कौशल्यांवर, दुसऱ्या सत्रात कॉर्पोरेट प्रशिक्षक डॉ. सुमित्रा चव्हाण यांनी नातेसंबंध कौशल्ये व नेतृत्व विकासावर तर जळगाव जनता सहकारी बँकेच्या एच.आर. प्रमुख विशाखा पटेल यांनी समस्या सोडविणे व वेळ व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले.

शेवटच्या सत्रात रागीब अहमद यांनी प्रभावी संवाद कौशल्ये व विश्लेषणात्मक क्षमता या विषयावर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. समारोप सत्रात प्रमुख अतिथी प्रा.अनिल डोंगरे यांनी विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक व वैयक्तिक प्रगतीसाठी कौशल्य संचाचे महत्त्व विशद केले. प्रास्ताविक प्रा.आर.आर. चव्हाण यांनी तर सूत्रसंचालन धनश्री शिरोडे यांनी केले. आभार दीपक फेरवानी यांनी मानले

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# धुळे मनपात शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेसचे जमले

## शहर विकास आघाडीसाठी गटनोंदणी; गटनेतेपदी शाहबाज फारुक शाह तर प्रतोदपदी मंगला सोनवणे यांची नियुक्ती

प्रतिनिधी । धुळे

**महापालिकेत विरोधी पक्षनेते पदासाठी एमआयएमकडून दावेदारीची तयारी असतानाच आता राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेने एकत्र येत मोठा धक्का दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेकडून शहर विकास आघाडी म्हणून एकत्र गट नोंदणी करण्यात आली आहे. तसेच गटनेते पदावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक तथा माजी आ. फारुक शाह यांचे पुत्र शाहबाज शाह यांची तर प्रतोद पदावर शिवसेनेच्या नगरसेविका मंगला सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

राष्ट्रवादीचे ८ आणि शिवसेनेचे ५ अशा १३ नगरसेवकांची ही शहर विकास आघाडी झाली असून आता विरोधी पक्षनेते पदावर दावा करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादीचे नेते तथा माजी आ.फारुक शाह यांनी दिली. तर शिवसेना जिल्हाप्रमुख मनोज मोरे यांनी देखील शिवसेना-राष्ट्रवादीची युती झाल्याचे म्हणत स्वीकृत नगरसेवक पदासाठी तसेच विरोधी पक्षनेते पदासाठी एक फॉर्मुला देखील निश्चित करण्यात येत असल्याचे म्हटले आहे.

धुळे महापलिकेसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपाने ५० नगरसेवकांसह पुन्हा एकदा बहुमत प्राप्त केले आहे. तर भाजपनंतर सर्वाधिक १० जागा एमआयएमने जिंकल्या आहेत. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने ८, शिवसेनेने ५ तर एक अपक्ष नगरसेवक निवडून आला आहे. भाजपाकडे सर्वात जास्त जागा असल्याने सत्तेची पदे भाजपाच्या ताब्यात राहतील तर विरोधी पक्षात एमआयएम, राष्ट्रवादी आणि शिवसेना




राहणार अशी चर्चा होती. दरम्यान, विरोधी पक्षनेते तसेच स्वीकृत नगरसेवक पदावर आपला दावा रहावा, यासाठी पुन्हा एकदा शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र येण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या १३ नगरसेवकांचा एकत्र गट नोंदवण्याचा निर्णय घेण्यात आला. विभागीय आयुक्तांकडे परवा दोन्ही पक्षाचे नगरसेवक आणि पदाधिकारी यांनी जावून धुळे शहर राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना पक्ष शहर विकास आघाडी या नावाने गट नोंदणी करण्यात आली आहे.

**गटनेते पद राष्ट्रवादीकडे**

शिवसेना-राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष अधिकृतपणे एकत्र आल्याने ते धुळे महापालिकेच्या सभागृहात शहर विकास आघाडीच्या रुपाने एकत्र काम करणार आहेत. या गटाच्या गटनेतेपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नगरसेवक शाहबाज शाह यांची तर प्रतोद पदावर शिवसेनेच्या नगरसेविका मंगला सोनवणे यांची निवड करण्यात आली आहे. आता दोन्ही पक्षाचे मिळून १३ नगरसेवक असल्याने विरोधी पक्षनेते पद, स्वीकृत नगरसेवक पदावर एकत्र निर्णय देखील घेण्यात येतील. शिवसेनेला तसेच राष्ट्रवादी काँग्रेसला देखील विरोधी पक्षनेते पदावर आलटून पालटून संधी देण्यात येईल. मात्र आधी कोणाकडे हे पद असेल यावर अद्याप निर्णय घेण्यात आलेला नाही. लवकरच यावर निर्णय घेतला जाईल, अशी माहिती माजी आ.फारुक शाह यांनी दिली आहे.

**रवी मामा यांचे नाव आघाडीवर**

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने एकत्र गटनोंदणी केल्याने आता त्यांचे १३ नगरसेवक झाले असून स्वीकृत नगरसेवक पदासाठी त्यांना कोटा पूर्ण करता येणार आहे. त्यामुळे स्वीकृत नगरसेवक पदासाठी इच्छुक असलेल्यांचीही नावे चर्चेत आली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार शिवसेनेकडून पराभूत उमेदवारांमधील एकाला संधी देण्यात येणार आहे. यात पार्वती जोगी उर्फ रवी मामा यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे

## थोडक्यात

### तरडी येथे पालक-शिक्षक मेळावा उत्साहात

**शिरपूर ।** तालुक्यातील तरडी येथील श्री विलेपार्ले केळवणी मंडळ कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये पालक-शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात महाविद्यालयाचे शैक्षणिक उपक्रम, अभ्यासक्रम रचना, मूल्यमापन पद्धती तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. त्यानंतर संबंधित विषयांच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत पालकांशी सविस्तर संवाद साधला.

### क्रिकेट स्पर्धेत हस्ती स्कूल विजयी

**धुळे ।** हस्ती बँक व हस्ती पब्लिक स्कूलचे संचालक स्व. दिनेश वोरा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिनेश वोरा फ्रेंडशिप क्रिकेट कपचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत हस्ती स्कूल संघ विजेता तर हिंदवी स्वराज संघ उपविजेता ठरला. फ्रेंडशिप कप स्पर्धेतील विजेता हस्ती संघाला रजनीकांत वोरा, नटूभाई वोरा, ज्योती वोरा, किशोर जैन, हिमांशू शहा, पिंकी माहेश्वरी आदींनी चषक देऊन सन्मानित केले. सामनावीर आपसिंग पावरा ठरले तर मालिकाविराचा सन्मान सुमित कोळी यांनी पटकावला.

## नंदुरबार येथे आज सर्वपक्षीय शोकसभा

प्रतिनिधी । नंदुरबार

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शनिवार, दि.३१ रोजी सकाळी ११ वाजता व्ही. जी. लॉन्स येथे सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.अभिजीत मोरे यांनी दिली.**

या शोकसभेत विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते, सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. राजकीय



मतभेद बाजूला ठेवून सर्व पक्ष एकत्र येत स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करणार आहेत. या शोकसभेला जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजीत मोरे यांनी केले आहे.

## बिलगाव वनक्षेत्रात २७ हजारांच्या सागवानी दांड्या, चौकट जप्त

प्रतिनिधी । धडगाव

**तालुक्यातील बिलगाव येथे वनविभागाने गस्तीदरम्यान केलेल्या कारवाईत २७ हजार ८०३ रुपयांच्या सागवानी दांड्या आणि चौकट जप्त केल्या. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

बिलगाव वनक्षेत्रात वनविभागाचे कर्मचारी जंगल गस्तीवर असताना एका ठिकाणी अवैधरित्या सागवानी लाकडाचा साठा करण्यात आल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने त्या ठिकाणी छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत



२४ हजार ९११ रुपये किमतीच्या १.११९ घन मीटरच्या २८ नग दांड्या व २ हजार ८९२ रुपये किमतीच्या ०.१३० घन मीटरच्या ८ नाग चौकट असा २७ हजार ८०३ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कारवाईनंतर जप्त मुद्देमाल वन कर्मचाऱ्यांनी शिरओझ्याने रस्त्यावरून वाहून शासकीय आणि खाजगी वाहनाद्वारे धडगाव टिंबर डेपोवर पावतीसह जमा केला.

**यांनी केली कारवाई**

प्रथमेश ढाणे, भरतसिंग परदेशी, वनरक्षक मंगेश वळवी, अशोक पावरा, पवन पाडवी, पूनम पावरा, मनिषा पावरा, जोली वळवी, दिलवरसिंग पावरा, गिरधर पावरा, वनमजूर भिका पाडवी, दारख्या पटले, शिवाजी पाडवी आदींनी ही कारवाई केली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास वनपाल प्रतिभा बोरसे करीत आहेत.

## जलजीवन मिशनची सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करा!

### ● जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांचे निर्देश

प्रतिनिधी । धुळे

**ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला नळजोडणी देणे हे जलजीवन मिशनचे मुख्य उद्दिष्ट असून या अंतर्गतची सर्व कामे प्राधान्याने व वेळेत पूर्ण करावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिल्या.**




जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील सातपुडा सभागृहात नुकतीच पार पडली. बैठकीला जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता जयश्री सार्वे, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक गिरीश भोरे, सहायक भूवैज्ञानिक सुवर्णा गांगुर्डे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत पुढे बोलतांना जिल्हाधिकारी विसपुते यांनी, शाळा, अंगणवाडी तसेच आश्रमशाळांमध्ये शंभर टक्के पिण्याच्या पाण्याची व शौचालयासाठी पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी. जे कंत्राटदार विहित कालावधीत कामे पूर्ण करणार नाहीत, त्यांना नोटीस देण्याच्या सूचना केल्या. तसेच अवर्षणग्रस्त भागात नाले, बंधारे येथे रिचार्ज शाफ्टची कामे हाती घ्यावीत, पिण्याच्या पाण्याची नियमित तपासणी करून त्याचा अहवाल सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीत जलजीवन मिशन अंतर्गत सुधारित अंदाजपत्रकांना मान्यता देणे तसेच करावयाच्या विविध योजना व जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना प्रस्तावांची सद्यः स्थितीचा आढावा घेण्यात आला.

## श्री खंडेराव महाराजांच्या यात्रोत्सवाला उद्यापासून होणार प्रारंभ

प्रतिनिधी । शिरपूर

**येथील जागृत देवस्थान श्री खंडेराव महाराज यात्रोत्सवास माघ शुद्ध पौर्णिमा म्हणजेच रविवार, दि.१ फेब्रुवारीपासून सुरुवात होत आहे. या मंदिराचे निर्माण राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी केले असून यात्रोत्सावास २७४ वर्षांची परंपरा आहे.**

यात्रोत्सवाला १ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.१५ वाजता माजी मंत्री आ. अमरिशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आ. काशिराम पावरा यांच्या अध्यक्षतेखाली व माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्याहस्ते महाआरती करून सुरुवात करण्यात येणार आहे. भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री



खंडेराव बाबा विकास संस्थेचे अध्यक्ष कैलास धाकड, उपाध्यक्ष संजय आसापुरे, कार्याध्यक्ष साहेबराव महाजन, कोषाध्यक्ष किरण दलाल, सचिव गोपाल मारवाडी, प्रमुख विश्वस्त गुलाब भोई, विश्वस्त गोपाल ठाकरे, शरद अग्रवाल, श्रीहरी यादगीरीवार, स्वीकृत सदस्य पुजारी माधवराव मोरे, पुजारी उत्तमराव मोरे, गोविंदा मोरे, भानुदास मोरे, संजय पाटील, सुभाष भोई, गजानन मगरे, प्रकाश भोई, संजय बारी, जगदीश बारी, राजेंद्र येशी, नाना सोनवणे, अशोक राजपुत, अरविंद राजपूत, व्यवस्थापक महेश देवकर आदींनी केले आहे.

## घोगरे महाविद्यालयात मतदार दिन साजरा

प्रतिनिधी । धुळे

**येथील श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्था संचलित डॉ.पां.रा. घोगरे विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.**



महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर सुरू असलेल्या गरताड येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपप्राचार्य प्रा.के.एम. बोरसे यांनी उपस्थित स्वयंसेवकांना आणि प्राध्यापकांना मतदार दिनाची शपथ दिली. प्राचार्य प्रा.डॉ. एम.व्ही. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## सोनगीर ग्रामपंचायत सदस्यांचा सन्मान

प्रतिनिधी । सोनगीर

**प्रजासत्ताक दिनानिमित्त धुळे जिल्हा पोलीस दलाच्यावतीने सोनगीर व परिसरात अपघाताच्यावेळी अपघातग्रस्तांना तत्काळ दवाखान्यात रवाना करणे तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनास मोलाची मदत करणाऱ्या येथील दोघा व्यक्तींचा सन्मान करण्यात आला.**



येथील माजी ग्रामपंचायत सदस्य अर्जुन शिवराम मराठे व किशोर खंडू पावनकर यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास डॉ.सुभाष भामरे, आ.अनुप अग्रवाल, आ.राघवेंद्र पाटील भदाणे, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे उपस्थित होते. सोनगीर व परिसरातील सामाजिक बांधिलकी जपत अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी तत्परतेने कार्य केल्याबद्दल तसेच पोलीस प्रशासनास सहकार्य केल्याबद्दल श्री.मराठे व श्री. पावनकर यांच्या कार्याचे मान्यवरांनी विशेष कौतुक केले.

## मोराणे सैनिकी विद्यालयात कलागुणांचा जागर

प्रतिनिधी । धुळे

तालुक्यातील मोराणे प्र.नेर येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलित श्री. छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ नुकताच पार पडला. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे हे तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या सचिव तथा माजी जि.प. सदस्या शालिनी भदाणे या होत्या. मान्यवरांच्याहस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी पथसंचलन केले.

## रामी येथे २१२ जणांची मोफत क्ष-किरण तपासणी

### दोंडाईचा उपजिल्हा रुग्णालय, फिरते एक्स-रे पथकाचा संयुक्त उपक्रम

प्रतिनिधी । दोंडाईचा

**फिरते एक्स-रे पथक व उपजिल्हा रुग्णालय, दोंडाईचा यांच्या संयुक्त विद्यमाने आयुष्मान आरोग्य मंदिर धावडे अंतर्गत रामी येथे टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत मोफत छातीचा एक्स-रे (क्ष-किरण) तपासणी शिबीर घेण्यात आले. त्यात २१२ जणांची तपासणी करण्यात आली.**



शिबिराचे आयोजन धुळे डीटीओ डॉ. सोनिया बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. धुळे येथील डीटीसी डॉ.तुप्ती अग्रवाल, वैद्यकीय अधिकारी डॉ. कदम यांनी विशेष सहकार्य केले.

शिबिरामध्ये एकूण २१२ लाभार्थ्यांच्या छातीचे एक्स-रे तपासणी करण्यात आली. या शिबिरात प्रामुख्याने ६० वर्षांवरील नागरिक, मधुमेह व रक्तदाब असलेले रुग्ण, जास्त खोकला असलेले, सतत आजारी असणारे, कमी वजनाचे व क्षयरुग्णांच्या संपर्कात आलेले संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमासाठी सरपंच कुलदीप गिरासे, विनोद हिरे, अक्षय मराठे, समुदाय आरोग्य अधिकारी दीपक साटोटे, एसटीएस दोंडाईचा सचिन ठाकूर, पवन, संदीप, आरोग्यसेविका नीता फड, आशा सेविका अरुणा रामराजे, जयश्री माळी, सुनंदा गिरासे, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

या उपक्रमामुळे क्षयरोगाचे लवकर निदान होऊन नागरिकांना वेळेत उपचार मिळण्यास मदत होणार आहे.

## कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अभियान यशस्वीपणे राबवा : निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार

प्रतिनिधी । धुळे

**आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यात ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीत कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र शोध मोहीम राबविण्यात येणार असून या मोहिमेचे सूक्ष्म नियोजन करुन हे अभियान यशस्वीपणे राबवावे, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांनी जिल्हा समन्वय समितीच्या बैठकीत दिल्या.**

कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा समन्वय समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. शीतलकुमार जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली जयभाये यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत बोलतांना श्री. पवार यांनी, धुळे जिल्ह्यात दि.३० जानेवारी ते १३ फेब्रुवारीदरम्यान कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अभियान (कुसुम) मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत निदान न झालेले कुष्ठरोग रुग्ण शोधून त्यांच्यावर त्वरित उपचार सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण व शहरी भागात सूक्ष्म नियोजन करून घरोघरी भेटी देत प्रत्येक व्यक्तीची तपासणी करण्यात यावी, संशयित रुग्णांची तपासणी व अचूक निदानासाठी पथकाचे सखोल प्रशिक्षण घ्यावे, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक व स्थानिक पदाधिकारी यांना कुष्ठमित्र म्हणून सहभागी करून घ्यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

